मंगळवार, दि. १७ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३१२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना मनपाच्यावतीने शाळा प्रवेशाचा उत्सव

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या सूचना प्रमाणे आज जालना शहर महानगरपालिका च्या वतीने शाळा प्रवेश महोत्सव साजरा करण्यात आला. त्यामध्ये महापालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, लेखा अधिकारी सर्व विभागाचे व प्रमुख यांनी महापालिकेच्या विविध शाळेवर जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागताचा व प्रवेशाचा महोत्सव साजरा केला.

त्याचाच एक भाग म्हणून आयुक्त संतोष खांडेकर यांनी नागेवाडी मनपा शाळा येथे जाऊन विद्यार्थ्यांचे रथामध्ये मिरवणूक काढली, प्रत्येक विद्यार्थी विद्यार्थिनीचे पुष्पगुच्छ कंपास बॉक्स, वॉटर बॉटल, मिठाई, शाळेची बॅग देऊन ड्रेस, पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.



त्याचप्रमाणे अतिरिक्त आयुक्त यांनी मुर्गी तलाव शाळेस भेट देऊन विद्यार्थी विद्यार्थ्यांचे स्वागत केले त्यावेळी त्यांनी प्रथम येणाऱ्या पहिली च्या विद्यार्थिनीचे पायाचे ठसे घेऊन स्वागत केले. त्याचप्रमाणे मनापाच्या वतीने मिठाई कंपास बॉक्स वॉटर बॉटल स्कूल बॅग पाठ्यपुस्तके ड्रेस देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले,

चंदनझिरा येथील शाळेत देखील उपायुक्त महोदयांच्या हस्ते सर्व विद्यार्थी विद्यार्थ्यांचे स्कूल बॅग नोटबुक वॉटर बॉटल मिठाई देऊन स्वागत करण्यात आले. मनपाचे सहाय्यक आयुक्त, लेखा अधिकारी सर्व विभाग प्रमुख यांनी विविध शाळेतून विद्यार्थ्यांचे स्वागत केले असा एकत्रित प्रवेश स्वागत महोत्सव महापालिकेच्या वतीने साजरा करण्यात आला

# प्रवेशोत्सव

### जाफराबाद तालुक्यातील स्ववर्गीय कमलाबाई लक्ष्मीनारायण काबरा चॅरिटेबल ट्रस्ट संवेदनाशील उपक्रम, शाळा प्रवेशाच्या दिवशी ४०० विद्यार्थ्यांना पेन वाटप









**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. प्रेमसुख काबरा यांच्या स्वर्गीय कमलाबाई लक्ष्मीनारायण चॅरिटेबल ट्रस्टचा अत्यंत संवेदनशील आणि स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. जाफराबाद तालुक्यातील जानेफळ, सावंगी, खानापूर, सावरगाव, नळविहिरा, हिवरा काबली, खामखेडा, जाफराबाद येथील कन्या प्रशाला येथील ४०० विद्यार्थी व शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन शाळा प्रवेशाच्या दिवशी स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना या उपक्रमाबद्दल कुतूहल निर्माण झाले. यापूर्वी सुद्धा स्वर्गीय कमलाबाई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दर रविवारी तालुक्यातील एका गावामध्ये वयोवृद्ध लोकांना मिठाई वाटपाचा कार्यक्रम राबवण्यात आलेला होता. त्यांच्या या राबवत असलेल्या अनेक स्तुत्य उपक्रमापैकी हा एक कार्यक्रम होता. त्यांचा हा कार्यक्रम सर्वच लोकांनी नावाजला. सर्वांनीच या कार्यक्रमाची स्तुती केली. व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या या ट्रस्ट बद्दल सहानुभूती निर्माण झाले. ॲड. प्रेमसुख काबरा यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ स्वतःच्या स्वनिधीतून हा चॅरिटेबल ट्रस्ट निर्माण केला असून, या चारिटेबल ट्रस्टमध्ये सामाजिक कार्यकर्त्या बरोबरच नामांकित उद्योगपती सुद्धा आहे. शिक्षक प्राध्यापक यांची सुद्धा या ट्रस्टमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती आहे. हा ट्रस्ट रजिस्टर असून विविध सामाजिक उपक्रम **पान २ वर**

## माजी आ. कैलास गोरंट्याल यांचा दिंडी प्रमुखांकडून सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघाचे मा. आ. कैलास गोरंट्याल यांनी वयोवृध्द वारकर्यांना दर्शनासाठी सोय केली. त्यबाद्दल मा.आ. गोरंट्याल श्रीसंत शांतीब्रह्म एकनाथ महाराज यांच्या मंदिराच्या विश्वस्ताची प्रतिमा व शाल श्रीफळ देवून हरिकिर्तनकार व गुरूकुलचे अध्यक्ष योगीराज महाराज लोखंडे यांनी सत्कार केला.



यावेळी विनेकरी भुतेकर, मा.आ. अप्पासाहेब चव्हाण, खुशालसिंहराणा ठाकुर, काँग्रेसचे महावीर ढक्का,आर. आर. खडके पाटील, अंकुशराव राऊत, राजेश राऊत, त्रिभुवन राऊत, वामनराव राऊत, विजय कामड, विजय राठी, संजय राठी, सुभाष भुरेवाल, विठोबा लोखंडे, हरिओम लोखंडे, अर्जुन पहेलवान लोखंडे , दिनेश नंद, राजेश भक्कड, आदिंची उपस्थिती होती.

## 'त्या'पोलीस निरीक्षकाला बडतर्फ करा; शेतकऱ्यांची निदर्शने

**जालना । प्रतिनिधी -** दोन दिवसांपूर्वी जालन्यात पालकमंत्री पंकजा मुंडेंना निवेदन देण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याला पोलिस निरीक्षक संतोष साबळे यांनी ढकलून जमिनीवर पाडले होते. पंकजा मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतल्यानंतर हा प्रकार घडला होता. दरम्यान शेतकरी गजानन उगले या शेतकऱ्याला ढकलून देणाऱ्या पोलीस निरीक्षक साबळे यांना पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात यावं या मागणीसाठी सोमवार (दि १६) रोजी दुपारी जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी निदर्शने करत पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचा निषेध नोंदवला.तसेच प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी आनंत कुलकर्णी यांना निवेदन देण्यात आले. कारवाई न केल्यास अमरण उपोषण करण्याचा ईशारा देण्यात आला.

## सर्वाइकल कॅन्सर हा लस घेऊन टाळता येणारा एकमेव कॅन्सर प्रकार- डॉ. कोठारी

### ऋषी विद्यालयात लसीकरण अभियानाबाबत जनजागृती



**जालना । प्रतिनिधी -** सर्वाइकल कॅन्सर हा लस घेऊन टाळता येणारा एकमेव कॅन्सर प्रकार आहे. त्यामुळे प्रत्येक मुलीने वयाच्या योग्य टप्प्यावर ही लस घेणे अत्यंत आवश्यक आहे. लस घेतल्याने भविष्यातील आरोग्य सुरक्षित होते आणि महिलांचे पुनर्जन्म दायिनी आयुष्य सुरक्षित होते, त्यामुळे पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन वीरा मेडिसिटी हॉस्पिटलचे कॅन्सर रोगतज्ज्ञ डॉ. शकुंत कोठारी यांनी येथे बोलताना केले.

कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या पुढाकारातून लायन्स क्लब जालना व सिव्हिल क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने २४ जून रोजी राबविण्यात येणाऱ्या मोफत लसीकरण प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर सोमवार दि. १६ जून रोजी मंठा रोडवरील ऋषी विद्यालयात आयोजित सर्वाइकल कॅन्सरविषयी जनजागृती कार्यक्रमात डॉ. शकुंत कोठारी बोलत होते. यावेळी ३५० पेक्षा अधिक विद्यार्थिनी उपस्थित होत्या. डॉ. कोठारी यांनी विद्यार्थिनींना सर्वाइकल कॅन्सर म्हणजे काय, तो कशामुळे होतो आणि त्यापासून संरक्षण कसे करता येते, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सर्वाइकल कॅन्सर हा महिलांच्या गर्भाशयाच्या मुखावर होणारा गंभीर आजार असून, तो मुख्यतः एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) या विषाणूमुळे होतो. या कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी ९ ते १८ वयोगटातील मुलींना देण्यात येणारी एचपीव्ही लस अत्यंत प्रभावी ठरते, असे त्यांनी सांगितले प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थिनींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

यावेळी ऋषी विद्यालयाच्या संचालिका सौ. शीतल भाला, प्राचार्या डॉ. हेमा सोनटक्के, मुख्याध्यापिका प्रतिमा गोरंट्याल, उपप्राचार्य यशवंत ढोलके, शिक्षक कोमल काटारिया, नितू अग्रवाल, सलोनी मुथा, सुचिता निश्चल, गौरी नावंदर, दीपाली अग्रवाल, ऋतुजा पांडे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजनासाठी लॉयन्स क्लब अध्यक्षा जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली, झोन चेअरपर्सन राजेश लुणीया, डिस्ट्रिक्ट को-ऑर्डिनेटर अतुल लड्ढा, प्रकल्प प्रमुख बळीराम बेन्द्रे, पी. के. खरात, विठोबा दराडे, वीरा हॉस्पिटलचे श्री. गाडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर विद्यार्थिनींना संमतीपत्र व माहितीपत्रक वाटप करण्यात आले असून, भरलेले संमतीपत्र १८ जूनपर्यंत शाळेत जमा करावे असे आवाहन करण्यात आले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ११ वर्ष; देशासाठी सुवर्णकाळ

### आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

**मंठा । प्रतिनिधी -** केंद्रातील मोदी सरकारच्या कार्यकाळाला ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात झालेल्या विकासकामांची माहिती देत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ११ वर्षाचा कार्याचा आढावा घेताना सर्वांना घर राष्ट्रीय महामार्गाचे जाळे ग्रामीण भागापर्यंत डांबरीकरणाच्या मुख्य रस्त्याच्या माध्यमातून जोडणे, मोफत धान्य योजना, उज्वला योजना देशभरातील विमानतळांची सुधारणा, देशभरातील रेल्वे स्थानकांमध्ये घडवून आणलेला अमोल आग्रह बदल, हरघर सोलार च्या माध्यमातून विज बिलपासून मुक्तता यासारखे शेकडो विकासकामे केली आहेत. त्यामुळे संपूर्ण जगभरात आज पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचा बोलबाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण यासह पाकिस्तान सारख्या उपद्व्यापी देशाला शिकवलेला धडा ही अत्यंत महत्त्वाची बाब ठरली आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले

महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात रेल्वेचे पावणे दोन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरु आहेत. जुनं युपीएचं सरकार होतं तेव्हा १० वर्षात जो निधी दिला तितका निधी एकाच वर्षात मोदी सरकारनं दिला. सहा लाख कोटी रुपयांची पायाभूत सुविधांची कामं झाली आहेत. यामध्ये पंतप्रधान आवास योजना रमाई आवास योजना शबरी आवास योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अहिल्यादेवी होळकर आवास योजना मोदी आवास योजना इत्यादीच्या माध्यमातून एकट्या परतुर विधानसभा मतदार संघात ४२ हजार घरं देण्याचा विक्रम केला आहे. मोदी सरकारने गरीब कल्याणाचा अजेंडा राबवला, जनतेला मोफत अन्नधान्य दिलं जातंय. मोदी सरकार येईपर्यंत नळ जोडणी कमी होती ती आता १५ कोटींवर गेली आहे. पीएम स्वनिधीचा लाभ मिळाला, ५२ कोटी लोकांना मुद्रा योजनेचे कर्ज मिळाले आहे. अनुसूचित जाती जमातीच्या मुलांना १४ हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. मागे राहिलेल्या जिल्ह्यांना पुढे आणण्याचे काम केले आहे. ५५ कोटी जनधन खाती, अन्न सुरक्षा ५१ कोटी, **पान २ वर**



# संपादकीय

## ‘जलसंधारण’ प्रत्येकाचे कर्तव्य!

भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस लवकर येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरताना दिसत आहे. ७ जूनला महाराष्ट्रात दाखल होणारा मान्सून यावर्षी २५ मे रोजीच दाखल झाला आहे. पाऊस लवकर आल्याने बळीराजाची चिंता दूर झाली आहे. पाऊस लांबला की पेरण्या लांबतात आणि पेरण्या लांबल्या की बळीराजाचे पुढील सर्व नियोजन कोलमडते. सुदैवाने राज्यात वेळेवर पाऊस सुरू झाल्याने राज्यातील अनेक भागात होणारी पाणीटंचाई मिटली आहे. सध्या राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली आहे. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही दमदार पाऊस कोसळत आहे. मान्सूनपूर्व पावसानेही राज्यात चांगलाच धुमाकूळ घातला होता. आताही राज्यात दमदार पाऊस पडत आहे. राज्यात दमदार पाऊस पडत असल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. उजनी सारखे मोठे धरण आताच ४० टक्के भरले आहे. राज्यातील सर्व नद्या,नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने यावेळी चांगलीच कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. सुदैवाने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असल्याने पाणी टंचाई मिटली आहे असे असले तरी पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. यावर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे. पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल. .

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारची लोकाभिमुख कारभाराची ११ वर्ष

मोदी सरकारने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यात म्हटले आहे की ११ वर्षात लोकांच्या आशा, गरजा आणि आकांक्षा केवळ ऐकल्या गेल्या नाहीत तर त्या जाणूनबुजून पूर्ण केल्या गेल्या. या काळात मध्यमवर्गाला देशाच्या प्रगतीच्या केंद्रस्थानी आढळले आहे. लोकांच्या हातात अधिक पैसे देणाऱ्या कर सवलतींपासून ते वृद्धापकाळात सुरक्षिततेचे आश्वासन देणाऱ्या पेन्शन योजनांपर्यंत, गेल्या ११ वर्षांत भारतीयांचे जीवन सोपे, न्याय्य आणि अधिक सन्माननीय बनवण्यासाठी सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक प्रयत्न झाले आहेत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली, भारताचा जीडीपी २०२५ संपेपर्यंत दुप्पट होवून ४.३ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सवर पोहोचण्याचा अंदाज आहे. सुधारणा, उदारमतवादी धोरण आणि स्वावलंबनामुळे हे शक्य झाले.

**विद्यापीठांची उभारणी -** सरकारने शिक्षणावर चांगला भर दिला आहे. २०१४-१५ मध्ये देशात विद्यापीठांची संख्या ७६० होती, जी मे २०२५ पर्यंत १३३४ इतकी वाढली आहे. यामुळे आता देशाच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळत आहे.

**महाविद्यालयांची उभारणी -** विद्यापीठांच्या वाढलेल्या संख्येसह महाविद्यालयांची संख्याही वाढली आहे. २०१४-१५ मध्ये देशात ३८,४९८ महाविद्यालये होती, जी मे २०२५ पर्यंत ५१,९५९ पर्यंत वाढली आहे.

**आयआयटीची संख्या वाढली -** २०१४ मध्ये १६ भारतीय तंत्रज्ञान संस्था (खखढी) होत्या. आता मे २०२५ पर्यंत आयआयटीची एकूण संख्या २३ झाली आहे.

**मुद्रा योजना -** प्रधानमंत्री मुद्रा योजना ८ एप्रिल २०१५ रोजी सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत लघु उद्योजकांना कर्ज दिले जाते. २३ जुलै २०२४ पासून उद्योजकांना दिल्या जाणाऱ्या कर्जाची मर्यादा १० लाख रुपयांवरून २० लाख रुपये करण्यात आली आहे.

**आयआयएम -** २०१४ मध्ये देशात १३ भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) होत्या. मे २०२५ पर्यंत ही संख्या २१ पर्यंत वाढली आहे.

**पीएम कौशल विकास योजना (पीएम केव्हीवाय) -** २०१५ पासून १.६३ कोटींहून अधिक तरुणांना विविध कौशल्य क्षेत्रात प्रशिक्षित करण्यात आले आहे.

**वैद्यकीय शिक्षणावर भर -** २०१४ पासून एम्स संस्थांची संख्या ७ वरून २३ पर्यंत वाढली आहे. याव्यतिरिक्त, वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या ३८७ वरून २०४५ पर्यंत वाढली आहे.

**स्टार्टअप इंडिया कार्यक्रम -** स्टार्टअप इंडिया उपक्रमाअंतर्गत देशातील १.६ लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअपना पाठिंबा देण्यात आला आहे, ज्यामुळे १७.६ लाखांहून अधिक नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत.

**खेलो इंडिया अभियान -** सरकारने देशभरातील खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठी पावले उचलली आहेत. खेलो इंडिया अंतर्गत ३,000 खेळाडूंना दरवर्षी ६.२८ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.



**विकासाभिमुख धोरणः**

मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्टार्टअप इंडिया, स्वच्छ भारत अभियान यांसारख्या उपक्रमांनी देशात नव्या घडामोडींना चालना दिली. उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना अशा योजनांनी सामान्य जनतेच्या जीवनात सुधारणा घडवण्याचा प्रयत्न त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत प्रामुख्याने केला.

**परराष्ट्र धोरणः-**

जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न केला. विविध देशांशी मजबूत संबंध प्रस्थापित करण्यात आले. संरक्षण आणि सुरक्षेचा विचार करता त्यांनी सर्जिकल स्ट्राईक (२०१६) आणि बालाकोट एअर स्ट्राईक (२०१९) व पहेलगाम हल्ला नंतर भारताने आपली संरक्षण क्षमता दाखवून दिली.

**रेशन योजना**

कोरोना काळात केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने मार्च २०20 मध्ये पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना (झचक्षध) ची घोषणा केली. लॉकडाऊन लागू झाल्यानंतर मार्च २०20 मध्ये ही घोषणा करण्यात आली होती. या योजनेचा उद्देश कोरोना संकटामुळे निर्माण झालेला ताण कमी करणे आणि लॉकडाऊननंतर गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि मध्यमवर्गीय लोकांना मोफत रेशन उपलब्ध करून देणे हा होता. सरकारने ही योजना पुन्हा एकदा २०२९ पर्यंत वाढवली आहे. केंद्र सरकारच्या या योजनेंतर्गत ८० कोटी शिधापत्रिकाधारकांना दर महिन्याला प्रत्येक सदस्याला ५ किलो अन्नधान्य (गहू किंवा तांदूळ) दिले जाते.

**प्रधानमंत्री उज्ज्वला योजना**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना (झचणग) ही मोदी सरकारच्या सर्वाधिक चर्चेत असलेल्या योजनांपैकी एक आहे, ज्याचा उल्लेख खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी सतत त्यांच्या भाषणांमध्ये करत असतात. या योजनेअंतर्गत गरीब महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन दिले जाते. मोदींनी १ मे रोजी २०१६ मध्ये ही योजना सुरू केली. योजनेच्या प्रारंभाच्या वर्षात १.५ कोटी कनेक्शन देण्याची योजना आखण्यात आली होती, परंतु २.२ कोटी लोकांनी कनेक्शन घेतले. या योजनेअंतर्गत मार्च २०२० पर्यंत वंचित कुटुंबांना ८ कोटी एलपीजी कनेक्शन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, जे ७ सप्टेंबर २०१९ रोजी पूर्ण करण्यात आले.

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी**

२०१९ मधील निवडणुकीच्या काही महिने आधी नरेंद्र मोदी सरकारने पंतप्रधान किसान सन्मान निधीची घोषणा केली होती. ज्याचा निवडणुकीत फायदा झाला आणि सलग दुसऱ्यांदा सत्तेत परतण्यात ते यशस्वी झाले. पीएम किसान योजना ही केंद्र सरकारची १००% निधी असलेली योजना आहे. ही योजना १ डिसेंबर २०१८ पासून सुरू झाली. या योजनेअंतर्गत, सर्व शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६,000 रुपयांची मदत दिली जाते. या योजनेचा लाभ कुटुंबातील पती, पत्नी आणि अल्पवयीन मुलांनाच घेता येतो. यासाठी शासनाकडून जाहीर होणारा निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केला जातो. १२ कोटी लोकांना पैसे देण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

**हर घर जल योजना**

मोदी सरकारने २०२०-२१ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात जल जीवन मिशन म्हणजेच हर घर जल योजनेची घोषणा केली होती. देशातील सर्व घरांमध्ये पाइपलाइनद्वारे शुद्ध पाणी पुरवठा करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेवर सरकार ३.५ लाख कोटी रुपये खर्च करणार आहे. या योजनेमुळे लोकांना घरपोच पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल, त्यांना पाण्यासाठी दूर जाण्याची गरज भासणार नाही, तसेच पाण्याच्या समस्येपासून पूर्णपणे सुटका होणार आहे.

**मोफत लसीकरण योजना**

कोरोना महामारीने संपूर्ण जगाला धडकी भरवरी होती, परंतु लसीकरणाने साथीच्या या रोगाविरोधात महत्त्वाची भूमिका बजावली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशात जगातील सर्वात मोठी मोफत कोरोना लसीकरण मोहीम सुरू केली आणि सलोखा लक्षात घेऊन इतर अनेक देशांना लस पाठवली. देशात लसीचा तुटवडा भासू नये म्हणून ते लस उत्पादक कंपन्यांच्या सतत संपर्कात होते. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार लसीकरण मोहिमेअंतर्गत आतापर्यंत २०० कोटी डोस देण्यात आले आहेत.

**स्टार्टअप इंडिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील स्टार्टअपला सातत्याने प्रोत्साहन देत आहेत आणि भारत सरकार स्टार्टअप इंडिया नावाची मोहीम राबवत आहे. आज भारताच्या स्टार्टअप इकोसिस्टमचे जगभरातून कौतुक होत आहे. पीएम मोदींनी अलीकडेच एका कार्यक्रमात सांगितले की २०१४ मध्ये देशात फक्त ३०० ते ४०० स्टार्टअप होते, आज त्यांची संख्या ७० हजार झाली आहे. भारत ही जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्ट अप इको सिस्टीम बनली आहे.

**महिला, यूथ आणि योजना**


महिला, युवक आणि नियोजन यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचा लोकांमध्ये चांगला संपर्क राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गरीब कल्याणाबाबत सरकार गंभीर असल्याचा भाजपचा दावा आहे. भाजपच्या विजयात या एमवायवाय समीकरणाचा महत्त्वाचा वाटा आहे आणि भाजप सध्या याच समीकरणावर पुढे जात आहे.

**संकलन**

**भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक, भाजपा सोशल मीडिया सेल, उत्तर नगर जिल्हा**

## श्री गुरु गणेश पतसंस्थेच्या अध्यक्षपदी विनय कोठारी, सचिवपदी राजेश लुनिया

**जालना । प्रतिनिधी -** येथील श्री गुरु गणेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी विनयकुमार कोठारी, सचिवपदी राजेश लुनिया तर उपाध्यक्षपदी सुभाष भंडारी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



या बैठकीला संचालक सुगनचंद ललवाणी, प्रशंसा बोहरा, श्यामसुंदर कोळी, तृप्ती कोठारी आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना अध्यक्ष विनयकुमार कोठारी म्हणाले की, या पतसंस्थेचे संस्थापक रमेश लुनावत, सचिव स्वरूपचंद ललवाणी, डॉ. कांतीलाल मांडोत, सुरजमल मुथा, सुभाषचंद गादिया आदींच्या पुढाकारातून सन १९९४ मध्ये कर्नाटक गजकेसरी गुरु गणेशलालजी महाराज यांच्या नावाने श्री गुरु गणेश नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना झालेली आहे. या संस्थेचे कार्यालय आता छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळील कोठारी आर्केडमध्ये सुरू होत आहे. या संस्थेत अत्याधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध केल्या जाणार असून समाज बांधवांच्या सहकार्याने पतसंस्थेचे मल्टीस्टेट बँकेत रूपांतर करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. शेवटी उपस्थितांचे आभार सचिव राजेश लुनिया यांनी मानले.

## पान १ वरुन

### प्रवेशोत्सव ...

राबवण्याचा मानस आहे.

स्वर्गीय कमलाबाई लक्ष्मीनारायण काबरा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रेमसुख जी काबरा यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी या उपक्रमाबद्दल माहिती देताना असे सांगितले की प्रथम दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांना गोळी लागावी त्यांना अभ्यासाबद्दल माहिती व्हावी त्यांच्यामध्ये कुतूहल निर्माण व्हावे शाळा कशी असते ही माहिती व्हावी म्हणून शाळा प्रवेशाच्या दिवशीच त्यांना पेन वाटप करण्याचा माझा मानस आणि चॅरिटेबल ट्रस्टच्या सदस्यांचा मानस त्यांनी बोलून दाखवलेला होता आणि तो त्यांनी आज पूर्ण केला. असे अनेक सामाजिक उपक्रम राबवण्याचा या ट्रस्टचा मानस आहे असं त्यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. त्याचबरोबर पूर्वी चालू असलेला वृद्धांना मिठाईवाटपाचा कार्यक्रमही लवकरच सुरू करण्यात येणार असून तालुक्यातील प्रत्येक गावात हा उपक्रम राबवण्याचा मानस आहे. यावर्षीपासून पहिल्या वर्गाला सीबीएससी पॅटर्न येत आहे त्याबद्दल कुठवर निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांमध्ये त्याबद्दल उत्सुकता आहे. या ट्रस्टचे अध्यक्ष एडवोकेट प्रेमसुख जी काबरा , उपाध्यक्ष, सचिव रंजीत शंकरलाल काबरा, सहसचिव प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, कोषाध्यक्ष पंकज सदाशिव काबरा, सदस्य म्हणून डॉक्टर विजय रामसुख जी जेथलिया, कृष्णा प्रेमसुख काबरा, नेहा प्रेमसुख काबरा, डर्ह्रीि धनाजी बरंडवाल, सौ रुचिका चेतन मामडे, अशोक सखाराम काबरा, या सर्व सदस्यांची ही चॅरिटेबल ट्रस्ट असून या ट्रस्टमार्फत विविध उपक्रम राबवण्याचा मानस आहे.

### पंतप्रधान नरेंद्र ...

जीवन ज्योती २३ कोटी आयुष्यमान ७७ कोटी खाते तयार केली आहेत आणि आरोग्य लाभ दिले आहेत. आतापर्यंत थेट मोदी सरकारने महाराष्ट्राला लाभ दिले ही संख्या ४३ लाख कोटी रुपयांपर्यंत जाते आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

नारी शक्ती संदर्भात ३३ टक्के आमदार खासदार असणार आहेत, याबाबत कायमस्वरूपी धोरण आणले. नियंत्रण रेषेवर पहिल्यांदा महिलांची तुकडी तैनात करण्याचे काम करण्यात आले आहे. ७३ टक्के घरं महिलांच्या नावावर आहेत. लखपती दीदी ३ कोटी तयार झाल्यात, १ कोटी महाराष्ट्राने बनवण्याचे ठरवले आहेत. ९0 लाख महिलांचे बचत गट तयार करत त्यांना एंगेज करण्याचे काम केले आहे. माता मृत्यू दर ८0 पर्यंत खाली आला आहे. युवकांचा विचार करत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणलं आहे. मूळ तत्व कायम ठेवत शिक्षण वैश्विक करण्याचे प्रयत्न आहेत ८ नवीन आयआयएम झालेत. ४९0 नव्या विद्यापीठांची स्थापना झाली आहे. १८-२८ गटातील ३ कोटी मुलांचे ईपीएफओ अकाऊंट झाले आहेत. १२ लाखांपर्यंत करमुक्त करण्याचा निर्णय झाला आहे. असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

भारतीय जनता पार्टी हा सर्वसामान्य नागरिकांचा पक्ष असून गावातील शाखाध्यक्षापासून देशाचा राष्ट्रीय अध्यक्ष पर्यंत आपल्या स्वकर्तुत्वाच्या बळावर प्रत्येक व्यक्ती स्वतःचे स्थान निर्माण करू शकतो, इतर पक्षांमध्ये मात्र त्यांच्या पक्षाचा अध्यक्ष कोण असेल हे ठराविक एक व्यक्ती किंवा कुटुंब ठरवते भारतीय जनता पार्टी मात्र कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी मानणारा एकमेव पक्ष असून पुढचा अध्यक्ष कोण असेल हे कोणीही सांगू शकत नाही सर्वसामान्य शाखाध्यक्ष पदावर काम करणारा व्यक्ती देखील पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदापर्यंत पोहोचू शकतो ही किमया केवळ भारतीय जनता पार्टीमध्ये होऊ शकते म्हणून कोणी कोणत्याही पक्षामध्ये गेले तरी गेली ४0 वर्ष आम्ही एकाच पक्षात आहोत आणि शेवटपर्यंत याच पक्षात राहू असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले.

वैशाली मंगल कार्यालय मंठा येथे आज भारतीय जनता पार्टी मोर्चे आघाड्या सेल च्या कार्यकारिणी जाहीर करणे कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी मंचावर माजी आमदार समन्वय समितीचे मराठवाडा विभाग अध्यक्ष श्री विलासराव खरात, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर, गणेशराव खवणे, सतीशराव निर्वळ अंकुशराव अवचार बाबुराव शहाणे उत्तमराव राठोड संदीप भैया गोरे नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे नितीन राठोड विक्रम उफाड अजय अवचार, सुरेश सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सज्ज राहावे आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती सह नगर पंचायत वर भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकविण्यासाठी पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता सज्ज असला पाहिजे. यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंठा व जालना ग्रामीण तालुक्याच्या कार्यकारीन्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या मंठा तालुकाध्यक्षपदी नितीन राठोड तर जालना ग्रामीण तालुकाध्यक्षपदी विक्रम उफाड यांची नियुक्ती करण्यात आली. परतूर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हे आपले ध्येय असून यापूर्वी देखील मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करत आलो आहोत यापुढे देखील मतदार संघाच्या विकासासाठी कुठलाही निधी कमी पडणार नाही त्यासाठी प्रयत्न करत राहू. पक्षाच्या बहाद्दर आणि निष्ठावान कार्यकर्त्यांच्या बळावर विधानसभेची निवडणूक जिंकलो असून संकटाच्या काळात मदत करणाऱ्या प्रत्येकाचा मी आजन्म ऋणी आहे. अनेकांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान साथ सोडली परंतु गोरगरीब सर्वसामान्य निष्ठावान कार्यकर्त्यांनी प्राण पणाला लावून विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीसह मला आशीर्वाद दिला असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले

भारतीय जनता पार्टीची मंठा व जालना ग्रामीण कार्यकारिणी आज माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आली यावेळी लोणीकरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्त पत्र देऊन सन्मानित करण्यात आले यामध्ये मंठा तालुका भाजपा अध्यक्षपदी नितीन उत्तमराव राठोड जालना ग्रामीण भाजपा तालुका अध्यक्षपदी विक्रम ऊफाड मंठा भाजपा शहराध्यक्षपदी दीपक बोराडे तर शेवली शहराध्यक्षपदी सौरभ माहुरकर यांची निवड करण्यात आली. भारतीय जनता युवा मोर्चाच्या मंठा तालुकाध्यक्षपदी आनंद जाधव तर जालना ग्रामीण तालुकाध्यक्षपदी विलास घोडके यांची नियुक्ती करण्यात आली. भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या मंठा तालुकाध्यक्षपदी रामकिसन बोडके तर जालना ग्रामीण तालुका अधक्षपदी समाधान वाघमारे यांची निवड करण्यात आली. भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा मंठा तालुका अधक्षपदी माजी उपसभापती नागेशराव घारे तर जालना ग्रामीण तालुका अध्यक्षपदी विशाल गीते यांची निवड करण्यात आली. भाजपा मंठा महिला आघाडी तालुका अध्यक्षपदी सौ यमुना शेषनारायण दवणे तर जालना ग्रामीण तालुकाध्यक्षपदी वनिता श्रावण चव्हाण यांची निवड करण्यात आली. भाजपा अनुसूचित जाती आघाडीच्या मंठा तालुकाध्यक्षपदी किशोर हनवते तर जालना ग्रामीण तालुका अधक्षपदी सतीश सदावर्ते यांची निवड करण्यात आली. सरपंच परिषदेच्या मंठा तालुका अध्यक्षपदी अमोल मोरे यांची निवड करण्यात आली. तर भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक आघाडीच्या जालना ग्रामीण तालुकाध्यक्षपदी अजीम शब्बीर पटेल यांची निवड करण्यात आली. आमदार बबनराव लोणीकर राहुल लोणीकर यांच्यासह पक्षाने सोपवलेली जबाबदारी निष्ठापूर्वक पार पाडू पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करू असा विश्वास नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी कार्यक्रमाला सर्वश्री पंजाबराव बोराडे कैलासराव बोराडे वैजनाथ बोराडे नाथराव काकडे गजानन देशमुख दारासिंग चव्हाण जिजाबाई जाधव ज्ञानेश्वर शेजुळ दिलीप पवार विकास सूर्यवंशी शरद पालवे राजभाऊ खराबे नितीन सरकटे मुस्तफा पठाण प्रसादराव गडदे विकास पालवे नारायण कणसे गणेश चव्हाळ अशोक बोराडे विठ्ठलराव कदम दिगंबर आवचार सुभाषराव बागल वसंत बागल अरुण खराबे संतोष बोराडे सोपानराव खरात बंडू नाना खरात कैलास चव्हाण रामकिसन मसळे जयश्री पवार आसाबाई राठोड राजेभाऊ नरवडे किसनराव चव्हाळ तानाजी शेंडगे सोनाजी जाधव अनिल चव्हाण नरेंद्र ताठे बाबाजी जाधव जानकीराम चव्हाण सचिन राठोड बाळू काळे कानोबा थोरात अशोक आप्पा सोनटक्के प्रकाशराव गबाळे गजानन उफाड नवनाथ चट्टे रामजी देशमुख शरद पाटील भगवान देशमुख आबासाहेब सरकटे शिवाजी थोरवे दत्तराव कांगणे प्रदीप चाटे नवनाथ खंदारे गजानन शिंदे पोपटराव खंदारे कैलास राठोड दीपक दवणे सोपान वायाळ दत्तराव खराबे प्रसाद चव्हाण बाळू इंगळे द्वारकादास चिंचणी शरद मोरे बाळासाहेब तौर कपिल तिवारी केतन चव्हाण विष्णू गायकवाड गौतम खरात तुकाराम वैद्य जगन राव टकले रावसाहेब बाहेकर राहुल बाहेकर विवेक काकडे आदिनाथ काकडे राजू राठोड श्री राम राठोड जितेंद्र सरकटे प्रल्हादराव सरकटे आदित्य केंदळे एकनाथराव जाधव नामदेवराव जाधव दत्तराव नरवडे कैलास घेंबड महेश पवार अंकुश काळे निवास राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मौजे मानेगाव येथील पाझर तलाव फुटल्याने शेतकऱ्यांचे नुकसान

## एक दिवशीय शेतकऱ्याचे जिल्हा परिषद समोर लाक्षणिक उपोषण

**जालना । प्रतिनिधी -** मौजे मानेगाव येथील पाझर तलाव फुटल्याने वीस ते २५ शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे जिल्हा परिषद जलतरण कार्यालय जिल्हा अधिकारी कार्यालय निवेदन देऊनही कारवाई न झाल्याने शेतकऱ्याने जिल्हा परिषद समोर एक दिवशीय लाक्षणिक उपोषण केले हे लाक्षणिक उपोषण लक्ष्मण जाधव संदीप आचलखाब बाबासाहेब आचलखांब गणेश रोदळे मिराबाई आचलखांब यांनी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले यावेळी संतोष डेंगळे दत्ता जाधव राजे कुंबे मुकेश चव्हाण वसंत शिंदे गणेश कदम आदींनी यावेळी उपोषणकर्त्याची भेट घेतली आहे.



# जाफराबाद तालुका व टेंभुर्णी परिसरात वादळ व पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबादसह टेंभूर्णी परिसरात गेल्या दोन तीन दिवसांत झालेल्या वादळ वारा आणि मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. परिसरामध्ये चक्रीवादळ सदृष्य पावसानं थैमान घातलं. अचानक आलेल्या या वादळी पावसानं शेतकऱ्यांची त्रेथातिरपट उडाली. या वादळी पावसानं उशिरा काढणीस येणाऱ्या गावरान आंब्याचं खुप मोठं नुकसान झालं आहे. आंब्याच्या झाडाखाली आंबा फळाचा अक्षरशः खच पडला आहे. यातील बरेच आंबे फुटले आहेत अन् पावसानं झाडाखाली झालेल्या गाऱ्यानं भरली आहेत. जांभूळ फळ पिकाचही मोठं नुकसान झालं आहे. या वादळी पावसानं काही मोठी झाडं उन्मळून पडली आहेत तर काही झाडं मोडून पडली आहेत. नुकत्याच लागवड झालेल्या मिरची पिकाची रोपं वाकून गेली आहेत तर नुकतेच उगवून येत असलेले भेंडी पिकाची रोपं दबून गेली आहेत. काही शेडनेट कोलमडून पडली आहेत. अनेकांच्या घरावरील, शेडवरील पत्रे उडाली आहेत. तासभर चाललेल्या या वादळी पावसानं मोठं नुकसान केलं असून या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून अगोदरच पेरणीसाठी त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची नितांत गरज आहे. २७ मे रोजी देखील गणेश पुर, टेंभुर्णी सह परिसरात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची मोठी नुकसान झाले होते यामध्ये साहेबराव खरात यांचे शेतातील सोलर पॅनल चे प्रचंड नुकसान झाले असून मी आणि जून महिन्यातील वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात यावे आणि आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी ॲग्रोव्हिजन गट शेती संघाचे अध्यक्ष संजय मोरे यांनी केली आहे.



# आयुष्याची सेकंड इनिंग पहिल्या इनिंग एवढीच महत्त्वाची

## निवृत्त पोलीस कमिशनर मनोज लोहिया यांचे प्रतिपादन

**जालना । प्रतिनिधी -** आयुष्याची सेकंड इनिंग ही पहिल्या इनिंग एवढीच महत्त्वाची आहे असे प्रतिपादन श्री मनोज लोहिया आयपीएस, निवृत्त पोलीस कमिशनर ह्यांनी केले. माहेश्वरी वरिष्ठ नागरिक संगठन जालना ह्यांच्या कार्यक्रमात ते बोलताना म्हणाले की पहिल्या इनिंग मध्ये ज्या ज्या गोष्टी आपण करू शकत नाही त्या साठी सेकंड इनिंग मध्ये भरपूर वेळ मिळतो व सर्व वरिष्ठ नागरिक यांनी ते आवर्जून केले पाहिजे. त्या बरोबर नव नवीन गोष्टी शिकणे, पर्यटन , मैत्री संबंध वाढविणे तसेच स्वतः चे आरोग्य सांभाळणे ह्या वर संपूर्ण लक्ष द्यावे असे त्यांनी सांगितले. प्रगत वैद्यकीय सुविधा मुळे सध्या आयुष्मान ८० वर्षा पुढे गेले असल्याने सेकंड इनिंग चे महत्त्व खूप वाढले असून सर्वांनी आनंदी जीवना साठी प्रयत्न करत राहून मैत्री चे नेटवर्क वाढवावे कारण परिवार लहान होत असल्याने वरिष्ठ नागरिक एकटे पडतात असे त्यांनी प्रतिपादन केले .



महेश भवन मध्ये झालेल्या ह्या कार्यक्रमात आधी संगठन चे अध्यक्ष ताराचंद मालपाणी यांनी प्रस्तावना करून सर्वांचे स्वागत केले. डॉक्टर भाला, गणेश दरक ह्यांनी मनोज लोहिया चे शाल, पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. मनोज लोहिया चे परिचय सचिव शरद लाहोटी ह्यांनी दिले.

कार्यक्रम मध्ये वरिष्ठ सदस्याचे वाढदिवस केक वाटून साजरे करून सर्वांना आनंदि जीवना साठी शुभेच्छा देण्यात आल्या.

ह्या सभेत डॉक्टर मोहन मणियार, डॉक्टर दीपक मंत्री, जगदीश राठी, विजय मुंदडा, रामकिसन मंत्री, रामविलास काबरा , बालकीसन करवा,रमेश तोतला , गोवर्धन करवा, जवाहर करवा, रमण मंत्री, शिवप्रसाद नावंदर, रामेश्वर डागा , पुसाराम मुंदडा, विजय मालपाणी, संतोष बाहेती, जुगलकिशोर होलानी, जयप्रकाश भक्कड, शिवरतन मानधना , प्रकाश मंत्री, दिलीप चेचाणी , विजय चेचाणी रमेश सोडानी , गोवर्धन बांगड , जयनारायण बांगड , श्रीनिवास नावंदर, प्रल्हाद राठी, बछराज राठी ह्यांचे सह सर्व संगठन चे सदस्य तसेच महिला सदस्य चंदा करवा, शोभा तोतला, मंगल लाहोटी, सीमा करवा, शोभा करवा, रानी बाहेती, मंगल झंवर, होलानी, दरक, छाया भक्कड, मंत्री, मानधना , मालपाणी , ह्यांचे सह सर्व महिला सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रम ची सुरुवात महेश पूजन करून झाली. तसेच अहमदाबाद व पहलगाम येथील दुर्घटना मधील निधन पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली देण्यात आली. आभार प्रदर्शन सचिव शरद लाहोटी ह्यांनी केले.

# भाजपाच्या परतूर तालुका शहर उपाध्यक्ष पदी कुलदीप बिनगे यांची निवड



**परतूर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीच्या परतुर तालुका शहर उपाध्यक्षपदी कुलदीप राव बिनगे यांची निवड करण्यात आली. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या विचाराने प्रेरित होऊन राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री . श्री .देवेंद्रजी फडवणीस भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री .चंद्रशेखरजी बावनकुळे ,कार्याध्यक्ष रवींद्रजी चव्हाण माजी मंत्री आमदार श्री. बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी प्रदेश सचिव श्री. राहुल (भैया) लोणीकर यांच्या सूचनेवरून कुलदीप राव बिनगे यांची परतुर तालुका शहर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. भारतीय जनता पक्षाला ताकद मिळवून देण्यासह पक्षाची ध्येयधोरणे विचार पक्षाचे काम तळागाळातील सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचे काम कराल असे दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# जिपप्राशा पारेगाव येथे विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

**जालना -** के प्रा शा माणेगाव खा केंद्रातील प्रा शा पारेगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत शालेय व्यवस्थापन समिती च्या वतीने करण्यात आले

पहिल्याच दिवशी इ १ ली ला प्रवेश घेणाऱ्या बालकांचा पालकासह स्वागतचा कार्यक्रम घेण्यात आला पहिली ला प्रवेश घेतलेल्या बालकांच्या पायाचे ठसे घेण्यात आले व विधर्थ्यांना पुष्यहार घालून स्वागत करण्यात आले त्यानंतर इ १ली ते ८ विच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तक पहिल्याच दिवशी देण्यात आले

सर्व विद्यार्थ्यांना बूट व सॉक्स चे देखील वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री अरुण देशमुख,शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष श्री केशव सुरुशे,सरपंच श्रीमती शेजुळ, भाऊराव शेजुळ,अशोक भुसारे, गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला व शिक्षणप्रेमी नागरिक यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक संजय चौधरी, सहशिक्षक अनंत जोशी, मदन गिरी हे उपस्थित होते.

## पीएम श्री जिल्हा परिषद प्रशालेत प्रवेशोत्सव; चिमुकल्यांचे गुलाब पुष्प देऊन केले स्वागत

# बाल मनाला शिक्षणाची गोडी लागण्यासाठी प्रवेशोत्सव महत्त्वाचा उपक्रम - आ.लोणीकर



**परतूर । प्रतिनिधी -** सर्वत्र शाळेचा पहिला दिवस प्रवेशोत्सव म्हणून साजरा केला जात आहे, विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे जंगी स्वागत शाळेमध्ये केले जात आहे त्यामुळे निश्चितच बाल मनाला शिक्षणाची गोडी गोडी लागेल असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

ते परतुर येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्रशालेमध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांची मानसिकता तयार करण्यासाठी निश्चितच या उपक्रमाचा मोठा फायदा होणार असून या माध्यमातून चिमुकल्यांना शाळेची ओढ लागावी, शाळेविषयी प्रेम निर्माण व्हावी व त्या माध्यमातून त्यांना शिक्षणाची गोडी लागावी हा उद्देश असून आपण लहान असताना अशा प्रकारची उत्सव वगैरे नव्हती मात्र त्यावेळच्या आठवणी अजूनही माझ्या मनात जागृत असून मी वर्गातला फार हुशार विद्यार्थी जरी नव्हतो तरी ग्रामीण भागातील शाळेमध्ये शिकत असताना अतिशय खोडकर असा विद्यार्थी होतो त्यामुळे खऱ्या अर्थाने मला शिक्षण घेता आले नाही याची खंत असून, राजकारणाच्या माध्यमातून मी मंत्रीपदापर्यंत पोहोचलो मात्र शैक्षणिक बाबतीत मला फारसे काही करता आली नाही त्याची खंत अजूनही माझ्या मनात असल्याचे सांगतानाच, पालकांनी आपल्या पाल्याकडे बारकाईने लक्ष देऊन त्याच्यात असलेले गुण फिरूनच त्यांना त्या त्या क्षेत्रामध्ये शिक्षण घेण्यासाठी उत्तेजन द्यावी असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले

पुढे ते म्हणाले की शिक्षण हे वाघिणीचे दूध असून झोपीला तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले असून शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिगत विकासाची सर्वदारी निश्चितपणाने खोली होतात त्या माध्यमातून देशाची सेवा करण्याची संधी मिळत असते असेही यावेळी त्यांनी सांगितले

यावेळी कार्यक्रमाला माजी आमदार विलास बापू खरात गट विकास अधिकारी राजेश तांगडे कडे गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके मुख्याध्यापक गणेश राठोड द या महाराज काटे भगवान तात्या मोरे पालक वर्ग शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



**गांधीनगर भागातील फेब्रिकेशनचे काम करणाऱ्या अनमशेख सलीम यांची मुलगी सादीया अनम शेख सलीम हीने नीट परिक्षेत ७२० पैकी ५०७ गुण संपादन करून यश प्राप्त केले आहे. या यशाने गांधीनगर परिसरासह शहराच्या नावलौकिक झाले. तीच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. गांधीनगर भागातील समाजसेवक अमजद खान अकबर खान यांनी त्यांच्या परिवाराचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी शाकेर खान, शब्बीर बिल्डर, सिकंदर खान, असलम मदनी, नवाज खान, वसीम खान आदींची उपस्थिती होती.**

# जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत

**जालना -** जिल्ह्यात आजपासून (दि.१६) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. आज शाळा सुरू होण्याच्या पहिला दिवस असल्याने जिल्ह्यातील सर्व शाळामध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. जालना तालूक्यातील दरेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आज जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी उपस्थित राहून सर्व शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांना सजवलेल्या बैलगाडीतून शाळेत आणण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी शालेय शिक्षण विभागामार्फत 'पहिले पाऊल' या उपक्रमातंर्गत इयत्ता पहिलेमध्ये प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शाळेतील पहिल्या पावलाचे ठसे घेवून त्यांचे शालेय जीवनातील प्रवेशाचे स्वागत करण्यात आले.




रोटरी प्रांतातील ११ जिल्ह्यात शंभर शाळांना संगणक प्रदान

# विद्यार्थ्यांना नव्या डिजिटल युगाशी जोडण्याचा प्रयत्न - डॉ. साबू

**जालना । प्रतिनिधी** - रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत 'डिस्ट्रिक्ट ग्रँट' व 'डिस्ट्रिक्ट वेल्फेअर ट्रस्ट' यांच्या सहकार्याने ११ जिल्ह्यातील रोटरी क्लबच्यावतीने १०० शाळांसाठी १०० डेस्कटॉप संगणकांचा लोकार्पण सोहळा शुक्रवार दि. १३ जून रोजी हॉटेल सॅफ्रॉनच्या सभागृहात पार पडला. याप्रसंगी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. निर्मला साबू, माजी प्रांतपाल सुहास वैद्य, सहाय्यक प्रांतपाल किशोर देशपांडे, ग्लोबल ग्रँटचे जिल्हाप्रमुख अनुप करवा, रोटरी क्लब जालनाचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, रोटरी क्लब जालना इलाईटचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, रोटरी क्लब जालना रेनबोचे अध्यक्ष महेश माळी, रोटरी क्लब जालना मिडटाऊनचे अध्यक्ष सागर दक्षिणी यांची उपस्थिती होती.

या उपक्रमांतर्गत प्रांतातील ज्या शाळांमध्ये अद्याप संगणक नाहीत, अशा १०० शाळांची डेस्कटॉप संगणकासाठी निवड करण्यात आली. जालन्यातील क्लबला ५ आणि अंबड क्लबला १ याप्रमाणे एकूण ६ संगणक प्राप्त झाले. त्यापैकी रोटरी इलाईट क्लबतर्फे या कार्यक्रमात जुना जालना भागातील श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुजाता प्रभाकर परदेशी यांच्याकडे प्रतिनिधिक स्वरूपात एक संगणक सुपूर्द करण्यात आला.




ग्रँट मंजुरीसाठी विशेष परिश्रम घेणारे ज्येष्ठ रोटरियन वेणुगोपाल राव, विनोद मतीवाला, शरद लाहोटी, सुरेश मगरे, अनुप करवा यांचा व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना प्रांतपाल डॉ. सुरेश साबू म्हणाले की, जालना रोटरीच्या आजवरच्या इतिहासात २ लाख अमेरिकन डॉलर ग्लोबल ग्रँट मिळालेला आहे. आपणास पहिल्यांदाच जालन्यातून पहिले प्रांतपाल बनवण्याचा बहुमान मिळाल्यानंतर प्रत्येक क्लबला ग्रँट मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न केले आणि एका वर्षात २.५ लाख अमेरिकन डॉलरचा ग्लोबल ग्रँट प्राप्त झाला. प्रांतातील १०० शाळांना प्रत्येकी एक संगणक म्हणजे रोटरीच्या सेवाभावी कार्याची ही आणखी एक सशक्त पायरी असून 'रोटरी सेवा म्हणजेच समाजासाठी सकारात्मक बदल' याचे हे उत्तम उदाहरण ठरले. आजच्या काळात संगणक हे केवळ यंत्र नाही, तर ज्ञान, संवाद, संशोधन आणि संधी यांचे दार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत संगणक पोहोचवणे म्हणजे त्यांना नव्या युगाशी जोडणे होय, असे डॉ. साबू म्हणाले. याप्रसंगी अनुप करवा यांनी ग्रँटसाठीची प्रस्ताव प्रक्रिया तर शरद लाहोटी यांनी या प्रक्रियेतील अनुभव विषद केले. रोटरी क्लब जालनाचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया यांनी शाळा निवड प्रक्रियेची माहिती दिली. रोटरी क्लब ईलाईटचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल यांनीही सर्वात गरजु शाळा कशी निवडली याबाबत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर देशपांडे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार महेश माळी यांनी मानले.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठीच पहिलीपासून सीबीएससी पॅटर्न-नारायणराव पिंपळे

## राष्ट्रीय शैक्षणिक २० धोरणानुसार पहिलीच्या शिक्षकांचं प्रशिक्षण संपन्न

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना, डॉक्टर राजेंद्र कांबळे यांच्या नेतृत्वाखाली, तालुका समन्वयक डॉ भरत सूर्यवंशी, गटसाधन केंद्र जाफराबाद, यांच्या संयुक्त विद्यमाने टेंभुर्णी येथील श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात, दिनांक १३ जून ते १५ जून पर्यंत इयत्ता पहिलीच्या शिक्षकांना नवीन अभ्यासक्रमाच्या धर्तीवरच प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण तीन दिवस, देण्यात आले असून तालुक्यातील दीडशेच्या वर शिक्षकांनी या प्रशिक्षणासहभाग नोंदवला, या प्रशिक्षणामध्ये सुलभक तथा प्रशिक्षक म्हणून, गटसाधन केंद्राचे गट समन्वयक नारायणराव पिंपळे, सुलभक पंजाबराव दांदडे, सुलभक्तता प्रशिक्षक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, सुलभक खरात सर, तसेच गेस्ट प्रशिक्षक, तथा अभ्यासक्रमाचे



सदस्य म्हणून झगरे सर, तसेच अभ्यासक्रमाचे सदस्य बंगाली सर यांनी भूमिका निभावली. या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी नारायणराव पिंपळे म्हणाले की शिक्षकांनी एन सी आर टी ने नेमून दिलेले नोट्स वापरत अभ्यासक्रम शिकवला पाहिजे सीबीएससी पॅटर्न म्हणजेच एनसीआरटीची अभ्यासक्रम रचना होय. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली असून, राज्य अभ्यासक्रमाच्या पायाभूत अभ्यासक्रम स्तरावर हा अभ्यासक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी तीन दिवस दीडशे शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले. हे प्रशिक्षण पीपीटी विविध व्याख्यान तसेच साहित्याच्या द्वारे शिक्षकांना देण्यात आले. या प्रशिक्षणातून शिक्षकांनी आता विद्यार्थ्यांना उद्यापासून मिळणाऱ्या पहिलीच्या पुस्तकानुसार कृतीयुक्त अनुभूती द्यायला सुरुवात केले करणार असल्याचे सांगितले. तसेच पराड सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक तथा प्रशिक्षक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून नारायणराव पिंपळे पंजाबराव दांदळे खरात सर बंगाळे सर झगडे गुरुजी यांचे आवर्जून उपस्थिती होती. तीन दिवस चाललेल्या या प्रशिक्षणातून शिक्षकांनी आनंद व्यक्त केला असून आम्ही आनंदी शिक्षण विद्यार्थ्यांना देणार असून सीबीएससी पॅटर्नला विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणार असल्याचे त्यांनी याप्रसंगी मनोगतातून व्यक्त केले. शेवटी नारायणराव पिंपळे यांनी सर्वांचे आभार मानून प्रशिक्षण संपल्याचे जाहीर केले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.